# आरे-वांद्रे दरम्यान लवकरच धावणार मेट्रो

*मुंबई* मेट्रो तीन मार्गाचे काम अंतिम टप्प्यात आले असून लवकरच पहिल्या टप्प्यात आरे ते वांद्रे-कुर्ला संकुलदरम्यान धावणार आहे. त्या पार्श्वभूमीवर एमएमआरसीएलने तिकीट विक्रीकरिता आणि ग्राहक सेवेसाठी एजन्सी नेमली जाणार आहे. त्याकरिता मेट्रो प्रशासनाने टेंडर काढले आहे. मुंबई मेट्रो ३ डिसेंबर २०२३ पर्यंत भूमिगत मेट्रो सुरू करण्याचे एमएमआरसीएलचे उद्दिष्ट होते. पण तांत्रिक कारणामुळे मेट्रोच्या कामाला विलंब झाल्याने सदरची डेडलाईन हुकल्याने एप्रिलमध्ये मेट्रो सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे.